दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■
•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २९१ •बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रुपये
• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955







# गोरक्षनाथ टेकडी येथे लाखो भाविकांच्या मेळ्यात अमृत महोत्सवी सप्ताह सांगता



## नवनाथ ग्रंथातील गर्भगिरी पर्वत म्हणजेच गोरक्षनाथ टेकडी: ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा

## नाथांचे ज्ञान गोरक्षनाथ भगवंतांनी संभाळले : ह भ प अक्रूर महाराज साखरे

- गुरु गोरक्षनाथ महाराज, साधू बाबा, किसान बाबा यांची झोपडी आज ही आहे तशी गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी जतन करून ठेवली आहे आहे
- गोरक्षनाथ टेकडीवर ऊर्जा केंद्र
- गुरु गोरक्षनाथ महाराज मंदिर
- गुरु किसन बाबा व साधू बाबा महाराज समाधी
- तुळजाभवानी माता मंदिर, दत्ता गुरु यांचे अत्यंत देखणी मूर्ती व मंदिर
- गुरुवर्य वैकुंठवासी किसान बाबा साधू बाबा महाराज यांच्या सानिध्यातून कडूलिंब हे त्याची आज हि पान गोड लागतात





बीड । प्रतिनिधी

**विसाव्या शतकातील महान संत श्री ह भ प वै. सदगुरू किसन बाबा महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह वर्ष ७५ वे अमृत महोत्सवी वर्षाची सांगता गुरुवर्य शांती ब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या धर्मनाथ बीज विषयी महत्व सांगणारे प्रवचन करण्यात आले ह भ प अक्रूर महाराज साखरे यांच्या काल्याच्या कीर्तन व महाप्रसादाचा महापंगतीने सांगता करण्यात आली.**

गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी धर्मनाथ बीज का साजरी केली जाते.तिचे काय महत्व आहे हे सांगताना बाबा म्हणाले नवनाथ ग्रंथा मध्ये गुरु मच्छिंद्रनाथ महाराज व गोरक्षनाथ महाराज भ्रमण करताना गोरक्षनाथ महाराजांनी गर्भगिरी पर्वत सोन्याचा केला ते सोन्याचा केलेला गर्भगिरी पर्वत म्हणजेच आपली गोरक्षनाथ टेकडी आहे नाथ संप्रदायात गहिनीनाथ महाराज यांना गुरु गोरक्षनाथ महाराज यांनी ज्ञान दिले तो आज चा दिवस नाथ संप्रदाय मध्ये धर्मनाथ बीज रूपाने साजरा केला जातो. धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सांगतेचे काल्याच्या ▶ उर्वरित पान २ वर







### ● किसान बाबा यांनी सुरू केलेली भाकरीची पंगत परंपरा

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवर्य वै. सदगुरू किसान बाबा महाराज यांनी परिसरातील गावातून भाकरी जमाकरून टेकडीवर पंगत घेऊन ७० ते ८० गावातील भाविक भक्त घेऊन येतात संपूर्ण ८ दिवस अखंड भाविक भक्तांची भोजन व्यवस्था केली जाते

### ● संन्याशाची गुरु शिष्य परंपरा जपणारी गोरक्षनाथ टेकडी

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी हि नाथ संप्रदायातील संन्याशाची गादी आहे येथे गुरुशिष्य परंपरा जपणारी गादी आहे गुरु गोरक्षनाथ महाराज यांच्या साधनेतून, तपाने सिद्ध झालेली भूमी आहे गुरु वै.साधू बाबा महाराज, गुरु वै.किसन बाबा महाराज, गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज अशी गुरु शिष्य परंपरा आहे.

### ● ऐतिहासिक पार्श्वभूमी आध्यात्मिक महत्व

नवनाथ ग्रंथामध्ये गुरु मच्छिंद्रनाथ महाराज व गुरु गोरक्षनाथ महाराज भ्रमण करताना गोरक्षनाथ महाराजाने सोन्याची विट फेकून सोन्याचा डोंगर केला तोच हा नवनाथ ग्रंथा मधील गर्भगिरी पर्वत म्हणजे गोरक्षनाथ टेकडी

### ● मान्यवरांची उपस्थिती

मनोज जरांगे पाटील, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी मंत्री बदामराव पंडित, राजेंद्र मस्के, योगेश क्षीरसागर, गंगाधर काळकुटे यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते .






दरवर्षी प्रमाणे याही वर्षी धर्मनाथ बीज निमित्त वैकुंठवासी किसन बाबा महाराज यांच्या कृपा आशिर्वादाने व श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी चे मठाधिपती ह.भ.प शांतीब्रम्ह गुरूवर्य श्री.नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली गोरक्षनाथ टेकडी येथे चालत असलेल्या भव्य अखंड हरिनाम सप्ताहास आज काल्याच्या किर्तना प्रसंगी उपस्थित राहुन गुरूवर्य नवनाथ बाबांचे आशीर्वाद घेतले व सुश्राव्य कीर्तनाचे श्रवण केले. यावेळी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.ह.भ.प अक्रूर महाराज साखरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. याप्रसंगी माझ्यासह सर्व संत महंत,राजकीय पक्षाचे नेते व भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते...!!



# नगरसेवकांवर नेमकी जबाबदारी काय ?


राज्यात नुकताच महापालिका निवडणुकांचा धुरळा उडाला आहे. मुंबई, पुणे, नाशिकसह अनेक शहरांमध्ये नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावून आपले 'नगरसेवक' निवडले आहेत. गुलालाची उधळण झाली, विजयोत्सव साजरा झाला, पण आता खऱ्या अर्थाने कामाची वेळ आली आहे. अशावेळी आपल्याला मतदान करून निवडून दिलेल्या त्या नगरसेवकाची नेमकी जबाबदारी काय ? तो आपल्यासाठी काय करू शकतो ? हे जाणून घेणे प्रत्येक सजग नागरिकासाठी आवश्यक आहे.

नगरसेवक म्हणजे नेमका कोण ?

नगरसेवक हा स्थानिक स्वराज्य संस्थेतील (महानगरपालिका किंवा नगरपरिषद) सर्वात महत्त्वाचा दुवा असतो. शहराचे वेगवेगळ्या प्रभागांत विभाजन केलेले असते आणि प्रत्येक प्रभागातून लोकशाही पद्धतीने एक प्रतिनिधी निवडला जातो, त्यालाच आपण नगरसेवक/नगरसेविका म्हणतो. सोप्या भाषेत सांगायचे तर, तो तुमच्या वॉर्डाचा 'मुख्यमंत्री' असतो.

नगरसेवकाची प्रमुख कामे आणि भूमिका

केवळ निवडणुकांपुरते हात जोडून येणे, इतकीच नगरसेवकाची ओळख नसते. त्याच्या खांद्यावर अनेक मूलभूत जबाबदाऱ्या असतात



मूलभूत सुविधा: रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, कचरा व्यवस्थापन, नाल्यांची स्वच्छता आणि पथदिवे यांसारख्या दैनंदिन समस्या सोडवणे.

प्रशासनाचा दुवा: प्रभागातील नागरिकांच्या तक्रारी महापालिका प्रशासनापर्यंत पोहोचवणे आणि त्या निकाली काढणे.

विकासकामे: प्रभागात नवीन उद्याने, वाचनालये, शाळा किंवा दवाखाने उभारण्यासाठी पाठपुरावा करणे.

अर्थसंकल्पात सहभाग: पालिकेच्या वार्षिक बजेटमध्ये आपल्या प्रभागासाठी जास्तीत जास्त निधी खेचून आणणे.

नगरसेवक 'पगार' घेतो की 'मानधन' ?

अनेकांना वाटतं नगरसेवकाला मोठा पगार असतो, पण तसं नाही. नगरसेवक हा 'सरकारी कर्मचारी' नसून 'लोकसेवक' असतो. त्यामुळे त्यांना पगार मिळत नाही, तर 'मानधन' (क्शेीरीळीा) मिळते.

महाराष्ट्रात महापालिकांनुसार हे मानधन १५ ते २५ हजार रुपयांच्या दरम्यान असते.

याशिवाय पालिकेच्या महासभा किंवा समित्यांच्या बैठकींना उपस्थित राहिल्याबद्दल त्यांना 'बैठकीचा भत्ता' दिला जातो.

नगरसेवक निधी: विकासाची 'किल्ली' – स्वतः चे मानधन जरी कमी असले, तरी प्रभागाच्या विकासासाठी नगरसेवकाच्या हातात 'नगरसेवक स्वेच्छा निधी' असतो. हा निधी वर्षाला साधारणपणे १ कोटी ते १.५ कोटी रुपयांपर्यंत असू शकतो. या निधीतून तो प्रभागातील किरकोळ पण तातडीची विकासकामे पूर्ण करू शकतो.

अधिकार आणि मर्यादा– नगरसेवकाकडे धोरण ठरवण्याचे आणि निधी मंजूर करण्याचे अधिकार असतात. मात्र, प्रत्यक्ष काम करण्याची जबाबदारी ही पालिकेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची असते. नगरसेवक हा या कामांवर नियंत्रण ठेवतो आणि ते वेळेत पूर्ण करण्यासाठी दबाव निर्माण करतो.

तुम्ही नगरसेवकाला कधी प्रश्न विचारू शकता ?

जर तुमच्या भागात आठवडाभर पाणी आले नसेल. कचरा कुंडीबद्दल काही अडचण असेल आणि तक्रार करूनही उचलली जात नसेल. रस्त्यावरचे दिवे बंद असतील. पावसाळ्यात गटारे तुंबून पाणी साचत असेल.

दरम्यान, थोडक्यात सांगायचे तर... नगरसेवक हा तुमच्या आणि महापालिकेच्या तिजोरीमधील 'दुवा' आहे. त्यामुळे आपला प्रतिनिधी नेमकी काय कामे करतोय आणि त्याने निधी कुठे खर्च केला, हे जाणून घेणेही आपला हक्क आहे.

# धर्माची शिकवण आणि आपत्तीत मदतीचा हात...!

शिख धर्मियांचा एक मोठा उपक्रम साजरा करताना या धर्माने विविध क्षेत्रात दिलेले योगदान आपण बघितले पाहिजे. त्यात सेवा आणि निस्वार्थ सेवा याकडे आपण लक्ष द्यायलाच हवे. पूर असो वा भूकंप किंवा इतर कोणतीही नैसर्गिक आपत्ती यात निःस्वार्थ सेवा या समुदायाकडून दिल्ली जाते. गरजूंना (सामुदायिक स्वयंपाकघर) अर्थात लंगरच्या माध्यमातून अन्न व निवारा देण्यासोबतच आपत्तीतून सुटका करणे व आवश्यक ते मदत कार्य करणे यासाठी शीख स्वयंसेवक योगदान देतात.

सेवा भाव अर्थात सेवा करवाना धर्म–पंथ याचा भेद न पाळता सर्वांना माणुसकीच्या नात्याने शक्यतोपरी मदतीचा हात स्वयंसेवक देताना जगभरात आपणास दिसतील.

गुरुद्वारांमध्ये २४ तास अखंड सेवा,मदतीचा एक भाग बनते त्यावेळी गरजूंना अन्न पुरवण्याचा मोठा स्रोत समाजासाठी खुला होतो.

जगभरात 'खालसा एड' (घहरश्रीर –ळव) च्या माध्यमातून आपत्तीच्या काळात मदत पुरवली जाते. यात शीख स्वयंसेवक जगभरात सर्व भौगोलिक सिमांच्या पलिकडे जाऊन मदत करतात.

आपत्ती काळात जी विविध कामे होतात त्यात भोजन व पिण्याचे पाणी पुरविणे, तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करणे व बचाव कार्यात सहभाग अशी विभागणी आपणास दिसते. यात सर्वाधिक मोलाचे कार्य म्हणजे आपत्तीच्या काळात पिडितांना भावनिक आधार देणे होय. आपत्तीत आप्त स्वकियांना गमावलेल्यांना मोठा मानसिक धक्का बसलेला असतो अशा सर्वांना भावनिक आधार देणे महत्वाचे असते हे काम स्वयंसेवक करतात.

शीख धर्मावर आणि धर्मतत्वांवर आधारित अशी आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था म्हणून खालसा एड'ची जगभरात ओळख आहे. केवळ धार्मिक शिकवण न राहता आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणारी एक महत्वाची ताकद म्हणून या स्वयंसेवी संस्थेला ओळख मिळाली आहे. याच स्वरुपाचे आपत्तीकाळात काम करणारी आणखी एक स्वयंसेवी संस्था म्हणजे 'युनायटेड शिख होय. या संस्थेने २०२५ मध्ये पंजाब मध्ये आलेल्या महापूरातून लोकांना सावरण्यास खूप मोठी मदत केली .या भूतो–न–भविष्यती महापूरामध्ये पंजाबात अतोनात नुकसान झाले. गावेच्या गावे यात बुडाली. अनेकजण विस्थापित झाले. घरे आणि शेती याचेही या पुरात मोठे नुकसान झाले.

या काळात २००० हून अधिक जणांची पुरातून सुखरूप सुटका करण्यासोबतच ८ हजाराहून अधिक नागरिकांना वैद्यकीय उपचार तसेच तात्पुरता निवारा, अन्न, पिण्याचे शुद्ध पाणी , वस्त्रे आणि गरजेचा शिधा पुरविण्यात या संस्थेने पुढाकार घेतला . या पुरात ८७ हून अधिक गावात पूर्णतः नुकसान झाले. यातील अनेकांना आर्थिक मदतीची गरज लागणार आहे यासाठी, एक लक्ष डॉलरचा निधी उभारण्याचे काम ही संस्था करीत आहे.

नैसर्गिक आपत्ती कोणत्या स्वरुपात समोर येईल हे सांगता येत नाही. या काळात मानवता वादी दृष्टीकोण आणि निःस्वार्थ सेवा याचा वस्तुपाठ शीख बांधवांनी जगासमोर सादर केलाय असं म्हणता येईल.

गुरू–शिष्य यांची परंपरा असलेल्या या मानवतावादी धर्मात शिष्य हा महत्वाचा या अर्थाने संस्कृत भाषेतून घेतलेला हा शब्द म्हणजे शीख ( शिष्य ) होय. पंजाब प्रांतात पंजाबी भाषा प्रामुख्याने बोलली जाते. ही भाषा ज्या लिपीत आहे ती लिपी म्हणजे गुरूमुखी होय. तर पाकिस्तान विभाजनानंतर पकिस्तानात गेलेल्या पंजाब प्रांतात याच बोलीसाठी शाहमुखी लिपी वापरली जाते.

भाषिक वैशिष्ट्य बघताना ही लिपी इंडो–आर्यन आहे. पंजाबी गुरूंनी स्वीकारलेली व ज्या भाषेत रचना केल्या गेल्या व ज्यात श्री गुरू ग्रंथ साहिब आहे ती गुरूमुखी लिपी ११ ते १२ व्या शतकात प्राकृत भाषेपासून आजपर्यंत आली आहे.

पाकिस्तानातील पंजाब प्रांतात वापरला जाणाऱ्या शाहमुखी लिपीवर लगतच्या पारशी (पर्शियन) आणि अरबी शब्दांचा प्रभाव



अधिक आहेत. जगभरात असलेल्या साधारण २ कोटीहून अधिक पंजाबी भाषकांची भाषा मुळ पंजाबी हीच आहे.

देशात पंजाब राज्याची प्रमुख अशी असणाऱ्या पंजाबी भाषेला लगतच्या हरयाणा आणि दिल्ली राज्यातही अधिकृत भाषा म्हणून ओळख मिळालेली जगात कॅनडा, युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, ऑस्ट्रेलिया आदी देशात पंजाबी भाषकांची संख्या अधिक आहे.

पाकिस्तानात असलेल्या पंजाब प्रांतात देखील पंजाबी ही सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. पंजाबमध्ये भाषिक महत्व लक्षात घेऊन भाषेच्या नावाने असणारे पंजाब विद्यापीठ आहे. याची स्थापना ३० एप्रिल, १९६९ रोजी पतियाला येथे करण्यात आली. या ठिकाणी पंजाबी भाषा संशोधन व तंत्रज्ञान शाखा आहे. या केंद्रातर्फे ऑनलाईन पंजाबी भाषेचा वापर तसेच सॉफ्टवेअर निर्मितीचे काम सातत्याने सुरू आहे. याचा माध्यमातून पंजाबी सायबर कमिटीला व सायबर क्षेत्रातील प्रत्येकाला मदत होत आहे.

पंजाबी भाषेबाबतचा विश्वकोष अर्थात एपलूलश्रेशिवळर तयार करण्यात आला असून हा ऑनलाईन विश्वकोष पतियाला येथील विद्यापीठाने २०१४ साली पंजाबीपिडीया (झ्रीपक्षरलळशिवळर) उपलब्ध करून दिला आहे.

१९५४ साली पंजाबी साहित्य अकादमीची स्थापना करण्यात आली असून याला पंजाब राज्य शासन भाषक प्रस्तावासाठी मदत करीत आहे. पंजाबी साहित्य अकादमी पुरस्कार साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी १९५५ पासून सुरू करण्यात आला आहे. ज्ञानपीठ नंतर दुसऱ्या क्रमांकाचा हा पुरस्कार मानला जातो.

या खेरीज कॅनडा–भारत शिक्षण संस्थेतर्फे प्रतिवर्षी ढाहान पुरस्कार देखील दिला जातो.

पंजाब आणि महाराष्ट्र यांना जोडणारा महत्वाचा दुवा संत नामदेवांच्या रचना आहेत. त्यांच्या रचना शिख धर्मग्रंथात समाविष्ट आहेत. याच निमित्ताने २०१५ साली संत नामदेवांची पंजाबातील कर्मभूमी असलेल्या घुमान येथे ८८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्यात आले होते.

संवाद हा भाषेतूनच पुढे जातो. त्याच संवादाचा सेतू नांदेड नगरीत 'हिंद–दि–चादर' श्री. गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमातून होणार आहे. भक्ती हा मार्ग आणि त्याचसाठी भाषा हे साधन याची प्रतिती या काळात नक्की येईल.

–प्रशांत दैठणकर /९८२३१९९४६६

◆ पान १ वरून पुढे...

## गोरक्षनाथ टेकडी....

कीर्तनात ह भ प अक्रूर महाराज साखरे यांनी नाथांचे ज्ञान गोरक्षनाथ भगवंतांनी सांभाळले तो ज्ञानाचा धर्म रथ धर्म रूपाने गहिनीनाथ महाराज यांना समर्पित केला म्हणून आज ते ज्ञान संपूर्ण जगाला कामी आले आहे अशा ज्ञानाला सर्व नाथ संप्रदायातील नवनाथांनी टिकवले व ज्ञानाचा धर्म रथ म्हणजेच धर्मनाथ बीज हा सोहळा श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सर्व जाती– धर्म पंथ सर्वांना एकत्रित करत गुरुवर्य महंत शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला असे ह भ प अक्रूर महाराज साखरे यांनी काल्याच्या कीर्तनात सांगितले काल्याचे संपन्न झाला.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे श्री ह भ प वै. सदगुरू किसान बाबा महाराज यांनी ७५ वर्षांपूर्वी धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सुरवात केली होती त्या सप्ताहचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज कुशल मार्गदर्शनाखाली सप्ताह मध्ये हरी किर्तन, प्रवचन, भावार्थ रामायण, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ, विष्णु सहस्रनाम, संगीत भजन हरी जागर असे कार्यक्रम सप्ताह मध्ये झाले.

## बीड नगरपालिकेमध्ये...

पाटील यांचे ज्येष्ठ चिरंजीव बीड जिल्हा सत्र न्यायालयातील सुप्रसिद्ध एडवोकेट गोविंदा शिराळे यांची स्वीकृत सदस्य म्हणून बीड नगरपालिकेमध्ये नुकतीच निवड केलेली आहे या मुळे बीड जिल्ह्यामध्ये बीड शहरांमध्ये एक आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण सध्या पाहायला मिळत आहे कारण एडवोकेट गोविंदा शिराळे हे अतिशय उत्कृष्ट सुसंस्कृत वकील असल्यामुळे उच्चशिक्षित असल्यामुळे बीड शहराच्या विकासाच्या बाबतीत त्यांना सखोल माहिती आहे की कोणत्या ठिकाणी विकास करायचा आहे कशाप्रकारे तो विकास करून घ्यायचा आहे नगर प्रशासनाकडून हा त्यांना सखोल अभ्यास असल्यामुळे आता बीड शहराचे नंदनवन होण्यासाठी वेळ देखील जास्त लागणार नाही असे बीड शहरातील नागरिकांमधून सध्या बोलले जात आहे बीड नगरपालिकेमध्ये कुठलाही भ्रष्टाचार अपहार एक अधिकार शाही ही खपून घेतली जाणार नाही भाजपाचे नेते हे होऊ देणार नाहीत असा देखील ठाम विश्वास बीड शहरातील जनतेला असल्यामुळे बीड शहरातील जनतेमध्ये एक उत्साहाचे वातावरण सध्या पाहायला मिळत आहे आता जनतेचे सर्व प्रश्न मार्गी लागतील अशी बीड शहरातील सुज्ञ नागरिकांना अपेक्षा आहे असे सध्या बीड शहरातील नागरिकांमधून बोलले जात आहे

◆ पान ४ वरून पुढे...

## तहसीलदार चंद्रकांत...

उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे त्यांच्याकडे आलेल्या सर्व तक्रारी तातडीने निकाली निघतील या अनुषंगाने सूचना देत असतात . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या वेळोवेळी मंडळाधिकारी ग्राम महसूल अधिकारी यांचा आढावा घेऊन रस्ते मोकळे करणे , सीमांकन करणे , त्यांना अनुक्रमांक देणे यासाठी बैठका घेत असतात .या अनुषंगाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली होती . पाहणीदरम्यान मंडळ अधिकारी डी . डी . जायभाये , ग्राम महसूल अधिकारी निशा खांडेकर , शिवराम येवले , अश्विनी अनकर तसेच भूमी अभिलेख विभागाचे संजय जायभाये उपस्थित होते . महसूल नकाशे आणि अभिलेखांच्या आधारे गाडीमार्गाची अचूक मोजणी करून एक किलोमीटर लांबीचा सार्वजनिक मार्ग निश्चित करण्यात आला . त्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात आली . या कारवाईमुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली समस्या अखेर सुटल्याची भावना व्यक्त होत आहे . या मार्गामुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे – येणे सुलभ झाले असून रुग्णवाहिका , शासकीय सेवा आणि आपत्कालीन वाहतूक अधिक गतिमान होणार आहे .

या संदर्भात तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्पष्ट भूमिका मांडताना सांगितले की , नकाशावर नोंद असलेले सार्वजनिक मार्ग कोणाच्याही खासगी मालकीचे नसतात . हे मार्ग सर्वसामान्य नागरिकांच्या वापरासाठी असून त्यावर अतिक्रमण होऊ देणे हे प्रशासनाच्या जबाबदारीविरुद्ध आहे . कायदा , संवाद आणि लोकहित यांचा समतोल साधत अशा मार्गांवरील अतिक्रमण हटविणे ही प्रशासनाची भूमिका राहील . कर्तव्य , करुणा आणि लोकाभिमुख प्रशासन यांचा संगम असलेली ही कार्यवाही म्हणजे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या प्रशासनशैलीचे प्रतिबिंब असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये होत आहे. अलीकडेच लोक रत्न पुरस्काराने सन्मानित झालेल्या शेळके यांच्या कार्यपद्धतीत निर्णयक्षमतेसोबत संवाद आणि संवेदनशीलतेलाही तितकेच महत्त्व दिले जाते , हे या कारवाईतून पुन्हा अधोरेखित झाले आहे . यापूर्वी गेवराई , पैठण , गंगापूर, अंबड , घनसावंगी येथे तहसीलदार पदावर कार्य करीत असताना त्यांनी रस्त्याच्या कामांना विशेष महत्त्व देऊन सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अत्यंत मोलाची भूमिका बजावली आहे . बीड तालुक्यातही त्यांनी आतापर्यंत सुमारे १०० किलोमीटर पेक्षा जास्त अंतराचे रस्ते मोकळे केले आहेत .या निर्णायक कार्यवाहीबद्दल ग्रामस्थांनी महसूल प्रशासनाचे आभार मानले असून ग्रामीण भागातील सार्वजनिक मार्ग मोकळे करण्याच्या या भूमिकेमुळे इतर ठिकाणीही अतिक्रमणाविरोधात ठोस संदेश गेल्याचे बोलले जात आहे .

◆ पान ४ वरून पुढे...

## मोफत पशु...

माहिती दिली. यानिमित्ताने गावातील विविध प्रजातींच्या जनावरांची आरोग्य विषयक तपासणी करून त्यांना होणाऱ्या दुर्धर आजारांविषयी काळजी कशी घ्यायची याविषयी जाणीव जागृती झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव यांनी केले. याप्रसंगी उपसरपंच प्रकाश सोळंके, पशुवैद्यकीय कर्मचारी श्री. नखाते, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, गावातील ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे तर आभार प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी मांडले.

## देवगावचे भुमिपूत्र...

ग्रामस्थ व माजी सैनिक– कार्यक्रमास माजी सैनिक शरद मुंडे यांच्यासह महादेव ढाकणे, आश्रुबा मुरकुटे, गबराजी गायकवाड, रामहारी नागरगोजे, चांगदेव मुंडे, बालासाहेब मुंडे, दादाराव मुंडे, नवनाथ मुंडे, सुमंत मुंडे, उत्रेश्वर मुंडे, महादेव कांबळे, रवींद्र मुंडे, गोपीनाथ मुंडे, बाबासाहेब नागरगोजे, राजाभाऊ नागरगोजे, रामहारी मुंडे, गणेश मुंडे, आणि बाबा मुंडे यांची विशेष उपस्थिती होती.

देवगावकरांचा अभिमान उत्तरेश्वर मुंडे – प्रा.हनुमंत भोसले

सत्काराला उत्तर देताना प्रा.हनुमंत भोसले सरांनी त्यांच्या कार्यावर तसेच जिवनावर प्रकाश टाकला असुन त्यांच्या कार्याचा गौरव केला. देवगावकरांचा अभिमान उत्तरेश्वर मुंडे आहेत तो सर्वांनी जपला पाहिजे असे सांगितले. उत्तरेश्वर मुंडे यांनी मिळवलेले हे यश केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण देवगावसाठी प्रेरणादायी आहे – माजी जि.प.सदस्य विजयकांत भैय्या मुंडे

उत्तरेश्वर मुंडे यांनी मिळवलेले हे यश केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण देवगावसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचा आदर्श येणाऱ्या युवा पिढीने घ्यावा असे प्रतिपादन या वेळी केले.यावेळी गावातील आजी–माजी सैनिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मुंडे यांना त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## रस्त्यांची तात्काळ...

कॉ. रवींद्र देवरवाडे, व्यंकट ढाकणे, आबा कांबळे,प्रवीण देशमुख ऊध्त्रख युवक संघटनेचे जिल्हा सचिव विशाल देशमुख, राज्य कमिटी सदस्य प्रशांत म्हस्के, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष जगन्नाथ पाटोळे, राहुल भावटणकर, परळी तालुकाध्यक्ष विजय घुगे, मुंजा नवगरे, सिद्राम सोळंके, जगदीश देशमुख, अशोक वाघमारे, प्रशांत देशमुख, प्रथवी देशमुख, प्रकाश कावळे,

◆ पान ४ वरून पुढे...

मदन राठोड,एकनाथ पांचाळ, अशोक जाधव प्रकाश घाडगे यांच्यासह मोठ्या संख्येने युवक सहभागी होते.

## आजच्या आधुनिक ...

अठराव्या शतकामध्ये महात्मा जोतीरावांनी सावित्रीबाईंना शिक्षीत करुन भारतीय समाजात एक नवी दिशा देण्याचे काम केलेले आहे. स्त्रीयांना शिक्षणाचे दरवाजे खुले करुन भारतीय समाजाला उंची देण्याचे काम केले आहे. असे प्रतिपादन डॉ. अनिता शिंदे यांनी केले. त्या मौजे काकडहिरा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबीरामध्ये बोलत होत्या. या कार्यक्रमास डॉ. यादव घोडके, डॉ. प्रमोद गायके, डॉ. सय्यद इमादोद्दिन, प्रा. जयंत साठे, प्रा. ज्ञानेश्वर घोडके, प्रा. डॉ. प्रियंका नवले, डॉ. वंदना शहाणे, डॉ. शेख शकील, डॉ. संजय काळे, डॉ. आघाव तसेच स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

## माऊली बालसदन...

दरम्यान आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवातील स्पर्धेत माऊली विद्यापीठ केज संचलित, माऊली बालसदन मांगवडगाव ता. केज जि. बीड येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन नेत्रदीपक यश संपादन केले.

या स्पर्धेत चि. निर्मळ आदित्य बंडु याने लांब उडी स्पर्धेत द्वितीय क्रमांक व चि. सोणवने सार्थक संजय याने चेस या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी . श्री. मनोज ससे साहेब, जिल्हा महिला व बालविकास पर्यवेक्षक मा. श्री. मंगेश जाधव, बालकल्याण समिती अध्यक्ष मा. श्री. अशोक तांगडे, . श्री. राजहंस सर, उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे अंबाजोगाई, केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड, केज नगरपंचायतचे गट नेते मा. श्री. हारुणभाई इनामदार, यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेतील विद्यार्थ्यांना माऊली बालसदनचे अधिक्षक श्री. मनोज पाटील यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी केलेल्या नेत्रदीपक कामगिरीबद्दल माऊली विद्यापीठ केजचे सचिव मा. श्री. आदित्य दादा पाटील, संस्थेच्या संस्थापिका मा. खासदार सौ. रजनिताई पाटील साहेब, संस्थाध्यक्ष मा. श्री. अशोकराव पाटील साहेब, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी मा. श्री. प्रताप मोरे सर, भारतरत्न राजीव गांधी माध्यमिक विद्यालय मांगवडगाव शाळेचे मुख्याध्यापक श्री. सोनवणे सर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करुन पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची वॉलस्टार टेक्नॉलॉजी येथे औद्योगिक भेट

## आयटी उद्योगातील प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव ; आदित्य पॉलिटेक्निक व वॉलस्टार टेक्नॉलॉजी यांच्यात सामंजस्य करार

बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक बीड येथील कंप्युटर सायन्स अँड इंजिनीअरिंग विभागाच्या द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी १७ जानेवारी २०२६ रोजी वॉलस्टार टेक्नॉलॉजी प्रा.ली., कोल्हापूर या नामांकित आयटी सॉफ्टवेअर कंपनीस औद्योगिक भेट दिली. या भेटीत ४१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यांना आयटी उद्योगातील प्रत्यक्ष कार्यपद्धती समजून घेण्याची संधी मिळाली. या भेटीचे आदित्य पॉलिटेक्निक व वॉलस्टार टेक्नॉलॉजी यांच्यात सामंजस्य करार झाल्याने विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान, प्रोजेक्ट डेव्हलपमेंटची प्रक्रिया आणि व्यावसायिक वातावरणाची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली. वेब व मोबाईल प्लिकेशन तयार करताना कोणत्या टप्प्यांतून काम



केले जाते, टीमवर्क कसे असते आणि ग्राहकांच्या गरजेनुसार सोल्युशन कसे विकसित केले जाते, याची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे समजावून सांगण्यात आली. या भेटीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे आदित्य पॉलिटेक्निक, बीड आणि वॉलस्टार टेक्नॉलॉजी प्रा.ली., कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, कार्यशाळा, औद्योगिक प्रकल्प आणि प्रॅक्टिकल आधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

वॉलस्टार टेक्नॉलॉजीच्या बिझनेस डेव्हलपमेंट टीमने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सॉफ्टवेअर क्षेत्रातील करिअर संधी, आवश्यक कौशल्ये, सायबर सिक्युरिटीचे महत्त्व, स्टार्टअप कंपन्यांमधील संधी तसेच भविष्यातील तंत्रज्ञान ट्रेंड्स याबाबत सविस्तर माहिती दिली. कंपनीच्या वर्किंग स्ट्रक्चरची माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांना आयटी उद्योगातील कार्यसंस्कृती समजण्यास मदत झाली.

या औद्योगिक भेटीबद्दल विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून, या अनुभवामुळे भविष्यातील करिअरसाठी योग्य दिशा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. आदित्य पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनामुळे ही औद्योगिक भेट यशस्वीरित्या पार पडली.यावेळी विभाग प्रमुख सलीम शेख , प्रा. अंकुर कांबळे, प्रा. सूरज शिंदे, प्रा. मुस्कान पठाण मॅडम, प्रा. पूजा जाधव मॅडम, प्रा. शिवानी जाधव मॅडम, प्रा. मिन्हाज शेख मॅडम यांची उपस्थिती होती.

### ● विद्यार्थ्यांनी काय जाणून घेतले

वेब डेव्हलपमेंट व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटची प्रत्यक्ष प्रक्रिया
मोबाईल प्लिकेशन डेव्हलपमेंटचे टप्पे .
UI/UX डिझाइनचे महत्त्व
आर्टिफिशियल इंटेलिजन्स व फुल स्टॅक डेव्हलपमेंटची ओळख
डिजिटल मार्केटिंगमधील आधुनिक पद्धती

### ● औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना झालेले शैक्षणिक फायदे

**अभ्यासक्रमातील ज्ञान आणि उद्योगातील प्रत्यक्ष कामकाजातील फरक समजला. आयटी क्षेत्रातील करिअर संधींची स्पष्ट दिशा मिळाली. प्रॅक्टिकल कौशल्यांचे महत्त्व लक्षात आले. इंटर्नशिप व प्रोजेक्ट संधी उपलब्ध होण्याचा मार्ग खुला झाला. भविष्यातील नोकरी व उद्योजकतेसाठी आत्मविश्वास वाढला.**

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट ) नांदेड येथे राज्यस्तरीय योगासन स्पर्धा उत्साहात संपन्न



नांदेड । प्रतिनिधी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांची राज्यस्तरीय योगासन स्पर्धा डायट श्रीनगर येथे यशस्वीरित्या पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील १५३ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धा चार गटांत घेण्यात आली. या स्पर्धेसाठी बीड येथील नामांकित योगाचार्य तथा आंतरराष्ट्रीय योग खेळाडू डॉ. राधा सचिन तांबे (घोलप) यांच्यासह डॉ. मधुकर भारती, सोपानराव काळे, प्रलोभ कुलकर्णी आदींनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी वरिष्ठ अधिव्याख्याता मंजुषा औंढेकर, राज्य समन्वयक बालाजी शेळके व प्राचार्य अमोल निळेकर यांचे मार्गदर्शन लाभले.शासकीय शिक्षकांसाठी प्रथमच आयोजित केलेल्या या स्पर्धेत डॉ. तांबे यांना पंच (परीक्षक) म्हणून संधी दिल्याबद्दल त्यांनी सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त आभार व्यक्त केले.

# स्वा सावरकर प्राथमिक विद्यालयात स्पर्धा परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा पालक मेळावा संपन्न



बीड । प्रतिनिधी

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित स्वा सावरकर प्राथमिक विद्यालयात पहिली ते सातवी पर्यंतच्या ओलिंपियाड, मंथन, शिष्यवृत्ती आणि इतर विविध स्पर्धा परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा पालक मेळावा आज आयोजित करण्यात आला होता. या पालक मेळाव्यासाठी एकूण २५३ पालकांनी सहभाग नोंदवला आहे. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका श्रीमती बालिकाताई देशमुख, प्रमुख वक्ते श्री सुरेश मुसळे सर, विभाग प्रमुख श्री राजकुमार अचवले व श्रीमती रूपालीताई गुळवेलकर, सकाळ सत्रातील स्पर्धा परीक्षा प्रमुख श्रीमती पल्लवी खंबायते, दुपार सत्रातील स्पर्धाप्रमुख श्री शरद भवर, सहप्रमुख श्री सचिन बारगजे, जेष्ठ शिक्षक श्री सचिन सानप उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रजनन करून करण्यात आली.

# सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीरार्थीनी लावली ३०० झाडे

बीड । प्रतिनिधी

सौ. के. एस. के. महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर मौजे काकडहिरा येथे सुरु असून रोज वेगवेगळे कामे केली जात आहेत. ज्यामध्ये ग्राम स्वच्छता व वेगवेगळया विषयावर वैचारीक प्रबोधन असे कार्यक्रम घेतले जात आहेत. दिनांक १८ जानेवारी व १९ जानेवारी रोजी स्वयंसेवकांनी ३०० वृक्षांची यशस्वीरित्या लागवड केली. गावाला जोडणार्या रस्त्याच्या कडेने वेगवेगळया प्रकारची झाडे लावण्याचे काम करण्यात आले. आज गाव असो की शहर वृक्षांची वानवा सगळीकडे जाणवत आहे. वृक्षतोड मोठया प्रमाणात होत असून वृक्ष लागवडीकडे सर्वांचेच दुर्लक्ष होताना दिसत आहे. नवनविण रस्त्यांचे निर्माण



करतेवेळी हजारो वृक्ष तोडले जात आहेत त्या तुलनेमध्ये वृक्षांची लागवड व संगोपन शुन्य आहे. परजन्यमान घटले की आपणाला झाडांचे तीव्र आठवण होते. उन्हाळयामध्ये जश्या जश्या झळा लागतील तसे सावलीची आठवण होते. मात्र झाडे लावण्याकडे मानवाचा कल अत्यल्प आहे. झाडांचे महत्व लक्षात घेता राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या माध्यमातून झाडे लावण्याचे काम यशस्वीरित्या करण्यात आले. या वृक्ष लागवडीच्या मोहीमेमध्ये सर्व स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग नोंदवला.

# हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांचा ३५० वा शहीदी समागम; जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारी रोजी होऊ घातलेल्या हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त आयोजीत सोहळ्यास जिल्ह्यातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. त्यासाठी जिल्ह्यामार्फत करावयाच्या पूर्वतयारीचा आढावा आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपायुक्त लखिचंद चव्हाण, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ,अन्न निरीक्षक वर्षा रोडे, गुरुद्वारा संस्थांशी संबंधित नंदकुमार अहुजा, गुरुज्ञान सिद्ध रणवीरसिंह , नरेंद्रसिंग तारासिंग जबिंदा, हरिंदरसिंग, जगदेव सिंग, रमेश वधवा, राज्य समिती सदस्य उत्तम चव्हाण, डॉ. सुदाम चव्हाण, करतार राठोड, कुलदीपसिंग छाबडा,सरदार हरिसिंग आदी मान्यवर उपस्थित होते. शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना मानणारे लाखो भाविक नांदेडमध्ये येत्या २४ व २५ जानेवारी रोजी येणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने



शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन असे नऊ समाज-संप्रदाय एकत्र येणार आहेत. श्री गुरु तेग बहादुर यांच्या त्याग, बलिदान व मानवतेसाठी दिलेल्या शहीदीचा इतिहास देश-विदेशात पोहोचवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी https://gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर रस्ते, रेल्वे, बस, वाहतूक व्यवस्था तसेच कार्यक्रमासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी महानगरपालिका, शाळा-महाविद्यालये, पोलीस यंत्रणा व परिवहन विभागाने समन्वयाने सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सुरक्षेच्या दृष्टीने नियोजन करावे. जिल्ह्यातून जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांची नोंद घेणे. त्यांच्याशी समन्वय साधून नांदेड येथील वाहनतळ व अन्य अनुषंगिक व्यवस्थांबाबत त्यांना अवगत करणे. या आयोजनासाठी योगदान देऊ इच्छिणाऱ्या व्यक्ति, संस्थांशी समन्वय साधणे, या आयोजनाबाबत तसेच या इतिहासाबाबत जनजागृती करणे यासंदर्भात नियोजन करण्यात यावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. या कार्यक्रमात सर्व समाजातील लोकांचा सहभाग घ्यावा

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक- कुंडलिकराव अतकरे

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक असुन शासकीय विभागीय ग्रंथालयातील ग्रंथांचे दालन सर्वांसाठी खुले असुन नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन मराठी प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष कुंडलिकराव अतकरे यांनी केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त समर्थनगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनाचे कार्यक्रमप्रसंगी उदघाटक म्हणून अतकरे बोलत होते. अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह गुलाबराव मगर, जिल्हा ग्रंथालय



अधिकारी सुभाष साबळे, देवगिरी कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापक श्रीमती वनिता निकम,जीवन कुलकर्णी व देवगिरी हायस्कूलचे शिक्षक कोलते उपस्थित होते.

मातृभाषेचा संस्कार व्यक्तीच्या अंतःकरणात खोलवर रुजलेला असतो. आनंद व दु:खासारख्या तीव्र भावना अनुभवताना मुखातून बाहेर पडलेले उद्गार हे मातृभाषेतीलच असतात.मराठी शब्दसाठा वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील ग्रंथांचे वाचन करण्याचे आवाहन सुनील हुसे यांनी केले.

प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री संतोष जाधव यांनी केले.सुत्र संचालन व आभार प्रदर्शन तांत्रिक सहाय्यक गोविंद खेडकर यांनी केले.शिक्षकवृंद व विद्यार्थी, विभागीय ग्रंथालयाचे सभासद,वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाअखेर उपस्थित विद्यार्थ्यांनी सामुहिक ग्रंथ वाचन केले.

ग्रंथप्रदर्शन दि.२८ तारखे पर्यंत सर्वांसाठी खुले असुन नागरिकांनी या ग्रंथप्रदर्शनाला भेट द्यावी व शासकीय विभागीय ग्रंथालयाचे सभासद होऊन येथील वाचन सुविधेचा लाभ घेण्याविषयी आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले आहे.

# पत्नीचं आजारपण आणि कर्जाचा वाढता डोंगर; हतबल शेतकऱ्याने आयुष्य संपवलं, कुटुंबाचा आधार हरपला

बीड । प्रतिनिधी



शेतीतील सततची नापिकी आणि त्यातच कुटुंबावर ओढवलेले आजारपण या दुष्टचक्रात अडकलेल्या एका शेतकऱ्याने मृत्यूला कवटाळल्याची धक्कादायक घटना गेवराई तालुक्यातील भोजगाव येथे घडली आहे. पत्नीच्या उपचारासाठी घेतलेले खासगी कर्ज आणि शेतीसाठी काढलेल्या बँकेच्या कर्जाची परतफेड कशी करायची, या विवंचनेतून सुधाकर संत (वय ५५) या शेतकऱ्याने हनुमान मंदिरासमोरील टॉवरला गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. शनिवारी सकाळी ही दुर्दैवी घटना उघडकीस आली.

भोजगाव येथील रहिवासी असलेले सुधाकर संत हे अल्पभूधारक शेतकरी होते. गेल्या काही काळापासून त्यांच्या पत्नी संजीवनी संत या पॅरालिसिस (अर्धांगवायू) सारख्या गंभीर आजाराने त्रस्त आहेत. त्यांच्या उपचारासाठी सुधाकर यांनी लोकांकडून हातउसणे पैसे घेतले होते. तसेच शेतीसाठीही बँकेकडून कर्ज काढले होते. मात्र, निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतातून अपेक्षित उत्पन्न मिळत नव्हते.

# शिखर पब्लिक स्कूलमध्ये विज्ञान व शालेय साहित्य प्रदर्शन उत्साहात

मांजरसुंबा । प्रतिनिधी

मांजरसुंबा येथील शिक्षण क्षेत्रात नावाजलेली व अग्रस्थानी असणारी शिखर पब्लिक स्कूलमध्ये दि १७ जानेवारी २०२६ रोजी स्व. अँड. बळवंतराव कदम यांच्या जयंतीनिमित्त विज्ञान प्रदर्शन व शालेय साहित्य प्रदर्शन मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा तसेच त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने सदर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान प्रयोग, नावीन्यपूर्ण संकल्पना व शालेय साहित्याचे आकर्षक सादरीकरण केले.



प्रयोगांमधून विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून समजावून सांगण्यात आल्याने उपस्थित विद्यार्थी व पालकांमध्ये विशेष उत्सुकता दिसून आली. विज्ञान प्रदर्शनास विद्यार्थ्यांसह पालकांनी मोठ्या संख्येने भेट देत भरभरून प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य भारत बप्पा काळे, दैनिक सूर्योदयचे कार्यकारी संपादक दिपक काळकुटे,सरपंच अरुण काका रसाळ, श्रीराम आप्पा घोडके (सरपंच), डॉ. पा. म. वि. माजी मुख्याध्यापक विष्णुपंत रसाळ, नामदेव घोडके सर, सनराईज इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष सातपुते सर, जगन्नाथ घोडके, अँड. नितीन रांजवण सर, सतीश सवासे, नारायण खुटाळे, दादा रसाळ, जि. प. शाळेचे अरबने सर, खान सर, बनसोडे मॅडम, डॉ. प्रशांत स्वामी, नितीन बांगर, संदीप कदम, नितीन कदम, संदीप इंगोले आदी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या प्रयोगांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड व आत्मविश्वास वाढतो, असे मत व्यक्त केले. सदर विज्ञान प्रदर्शन यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शाळेच्या प्राचार्या आशा कदम मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. एकूणच हा उपक्रम शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत उपयुक्त ठरला.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३७/२०२६**

अर्जदार :- **१) पुजा भ्र. दिपक सरोया, वय-३२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. गढी, ता. गेवराई, जि. बीड. २) नितीन पि. दिपक सरोया अ.पा.क आई अर्जदार क्र. १ वय-९ वर्षे, रा. गढी, ता. गेवराई, जि. बीड. ३) कुणाल पि. दिपक सरोया अ.पा.क आई अर्जदार क्र. १ वय-७ वर्षे, रा. गढी, ता. गेवराई, जि. बीड. ४) स्नेहा पि. दिपक सरोया, अ. पा. क आई अर्जदार क्र. १ वय-४ वर्षे, रा. गढी, ता. गेवराई, जि. बीड.** विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

प्रकरण :- भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत नामे दिपक पि. राजपाल सरोया** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे दिपक पि. राजपाल सरोया, रा. धुळे सोलापुर रोड उडान पुल गढी ता. गेवराई जि. बीड हे दिनांक २६/०५/२०२५ रोजी रा. गढी, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क्र. २ ते ४ ही मयताची अज्ञान अपत्ये आहेत. तसेच मयताची आई नामे ओमवती राजपाल सरोया या दिनांक ०२/०९/२०२४ रोजी मयत झालेल्या आहेत. मयताचे वडील नामे राजपाल सुरतसिंग सरोया हे देखील पुर्वीच मयत झाले आहेत. तसेच त्यांच्या स्थावर व जंगम मिळकतीसंबंधी मृत्युपत्र बनवलेले नाही अथवा कोणालाही नामनिर्देशीत केलेले नाही असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

मयताचे नांवे दिपक पि. राजपाल सरोया यांच्या नावे इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया शाखा ९८६ जालना ता. जि. जालना मधील पॉलीसी क्र. ९८३८८२६८० वरील बेसीक क्लेम रक्कम रूपये ३,३३,२००/- व डीएबी क्लेम रक्कम रू. ५,३३,२०० /- व त्यावरील आजपर्यत चे व्याज व्याज व त्यावरील मिळणा-या लाभासह उचलनेचे अधिकार देण्यात यावेत असे अर्जदारांनी म्हटले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक १५/०१/२०२६**

आज दिनांक / ०१ / २०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(अॅड. दाभाडे के. व्ही.)**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

दैनिक
# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ ●



बीड चे उपनिबंधक अधिकारी श्री. अशोक कदम सर यांची उपनिबंधक सहकारी संस्था तालुका नांदेड या वर्ग एक पदावर पदोन्नती झाल्याबद्दल सहकार खाते कर्मचारी संघटना लातूर विभाग आणि राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना जिल्हा शाखा बीडच्या वतीने हार्दिक हार्दिक अभिनंदन आणि पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा.



बीड वकील संघातर्फे नवनिर्वाचित नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे, ॲड. महेश धांडे, ॲड. संजय उद्धव यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

### भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय नेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी एकनिष्ठतेला न्याय देऊन...

## बीड नगरपालिकेमध्ये स्वीकृत सदस्य पदी एड. गोविंदा शिराळे यांची नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून सन्माननीय स्व. गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या कार्य काळापासून एकनिष्ठ एक तत्व असणारे जसे की प्रभुराम चंद्राचे देखील एक व्रत आहे एक बाणी एक पत्नी आणि एक वचनी तसेच प्रकारे नवनाथ अण्णा यांचे देखील व्रत अतिशय तशाच प्रकारे कडक आहे त्यांनी देखील पक्षाशी एकनिष्ठता दाखवून आजपर्यंत प्रामाणिकपणे भारतीय जनता पार्टीचे जाळे बीड जिल्ह्यामध्ये नव्हे तर मराठवाड्यामध्ये त्यांनी पक्ष वाढीसाठी विणलेले आहे याच उत्कृष्ट कार्याची एक त्यांना पोचपावती म्हणून महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री भारतीय जनता पार्टीच्या नेत्या पंकजाताई मुंडे यांनी मा श्री नवनाथ अण्णा शिराळे ▶▶ उर्वरित पान २ वर



● एडवोकेट गोविंदा नवनाथ शिराळे व रुक्मिणी नवनाथराव यांनी वार्ड नंबर २५ मध्ये उमेदवारी अर्ज भरण्याची पूर्ण तयारी दर्शवली होती व निवडणूक लढवण्याची तयारी देखील केली होती परंतु आदरणीय पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी रात्री अकरा वाजता भ्रमर धोनी वरून नवनाथ शिराळे पाटील यांच्याशी चर्चा करून उमेदवारी अर्ज आपण भरू नका अशी विनंती विनंती केली होती त्यांच्या विनंतीस मान देऊन गोविंद शिराळे आणि रुक्मिणी नवनाथ शिराळे यांचे अर्ज नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी भरलेच नव्हते म्हणून याबाबत डॉक्टर सारिका ताई योगेश क्षीरसागर यांनी गटनेता या नात्याने स्वत: जिल्हा अधिकारी यांच्या ऑफिस मध्ये एडवोकेट गोविंदा नवनाथ शिराळे यांची नंबर एक उमेदवारी अर्ज शिफारस केली असल्यामुळे एडवोकेट गोविंदा नवनाथ शिराळे हे बीड नगरपालिकेमधून बिनविरोध निवडून आलेले आहेत म्हणून सध्या बीड शहरातील सर्व सुज्ञ नागरिकांमध्ये सध्या एक आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे .

## लघुउद्योग पुरस्कार योजनेसाठी २३ जानेवारी पूर्वी अर्ज करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरावर लघु उद्योग क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणा–या लघु उद्योग घटकांना सन २०२४ व २०२५ या दोन वर्षाचे जिल्हा पातळोवरील प्रथम व द्वितीय जिल्हा पुरस्कार प्रदान करण्यासाठी जिल्हयातील पात्र सुक्ष्म, लघु उद्योग घटकाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. निवड केलेल्या उद्योग घटकास स्मृती चिन्ह व प्रथम पुरस्कारासाठी रु.१५०००/– आणि द्वितीय पुरस्कारासाठी रु.१००००/– रोख रक्कम माननीय पालकमंत्री यांचे शुभहस्ते देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे. तरी खालील अटींची पुर्तता करणा–या लघु उद्योग घटकांनी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांचेकडे विहीत नमुन्यातील अर्ज खालील कागदपत्रासह सादर करावेत. १. उद्योग घटक मागील पाच वर्षापासून नियमित उत्पादन असणे आवश्यक आहे. २. लघु उद्योग घटकाने पाच वर्षापुर्वी स्थायी उद्योग नोंदणी केलेली असावी. ३. मागील तीन वर्षामध्ये घटकास सातत्याने नफा (Profit) झालेला असावा व रोजगार निर्मितीमध्ये वाढ होणे अपेक्षित आहे. ४. कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. ५. लघु उद्योग घटकास यापूर्वी कोणताही राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला नसावा. ६. उत्पादनासाठी नविन तंत्रज्ञान अवलंबिलेल्या घटकास प्राधान्य राहील. सन २०२४ व २०२५ करीता जिल्हा पुरस्कार योजनेतंर्गत जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांचेकडे अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २३.०१.२०२६ आहे. बीड जिल्ह्यातील लघु उद्योजकांनी सदर योजनेच्या अर्जासाठी व या बाबतच्या अधिक माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्र, शिवशारदा सुझुकी शोरुम शेजारी, हॉटेल गुडलक जवळ, जालना रोड, बीड दुरध्वनी क्र.०२४४२–२२२२८५ ई–मेल आयडी, didic.beedmaharashtra.gov.in यावर संपर्क साधावा, असे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### कर्तव्य , संवाद आणि ठाम निर्णयांचा परिणाम...

## तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या पुढाकाराने पिंपळगावघाटचा एक किलोमीटरचा गाडीमार्ग खुला

**पिंपळगावघाट । प्रतिनिधी**

पिंपळगावघाट ( ता . बीड ) हद्दीत नकाशावर स्पष्ट नोंद असलेला सुमारे एक किलोमीटर लांबीचा ग्रामीण गाडीमार्ग अतिक्रमणामुळे मागील अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत होता.

या मार्गाच्या अभावामुळे ग्रामस्थांना एका गावातून दुसऱ्या गावात जाण्यासाठी मोठा वळसा घालून प्रवास करावा लागत होता. अखेर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या ठाम भूमिकेमुळे , वरिष्ठ स्तरावरील मार्गदर्शन आणि महसूल यंत्रणेच्या समन्वयातून हा महत्त्वाचा सार्वजनिक गाडीमार्ग अतिक्रमणमुक्त करून



वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. सदर गाडीमार्ग पोटखराब जमिनीवर असूनही काही व्यक्तींनी त्यावर बेकायदेशीर अतिक्रमण करून तो पूर्णतः बंद केला होता . याबाबत ग्रामस्थांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत होत्या . या तक्रारींची गंभीर दखल घेत तहसील स्तरावरून कार्यवाही सुरू करण्यात आली . सार्वजनिक मार्ग मोकळे ठेवण्याबाबत शासनाच्या स्पष्ट धोरणानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश वरिष्ठ स्तरावरून देण्यात आले आहेत. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे ग्रामीण भागातील रस्ते मोकळे करून देण्याबाबत विशेष प्रयत्न आहेत. त्या अनुषंगाने त्यांनी अनेक शासन निर्णय सुद्धा काढलेले आहेत.

छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचा सुद्धा ग्रामीण रस्त्यांबाबत नेहमी पाठपुरावा असतो आणि शेतकऱ्यांनी साठी असे रस्ते मोकळे करून देण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत अत्यंत सजगपणे त्यांचे प्रश्न ऐकून सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात . बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक हे सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सदैव तत्पर असतात . निवासी ▶▶ उर्वरित पान २ वर

## मोफत पशु चिकित्सा शिबिरास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**अंजनडोह । प्रतिनिधी**

अंजनडोह येथे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिरामध्ये शेतकरी व पशुपालकांसाठी मोफत पशु चिकित्सा शिबिरामध्ये आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये गावातील शेतकरी वर्गाने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी पशु चिकित्सा शिबिरावेळी रासेयोजनेचे स्वयंसेवक व गावातील शेतकऱ्यांना प्रमुख मार्गदर्शन गटविकास अधिकारी श्री. वैजनाथ लोखंडे यांनी केले. या शिबिराच्या शेतकरी व स्वयंसेवकांना शिबिराच्या निमित्ताने सखोल व सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी पशु चिकित्सक डॉ. ए. ए. फुंदे यांनी शेतकऱ्यांना पशुंना होणाऱ्या विविध आजारांविषयी माहिती दिली. डॉ. राधिका वराडे पशुंची निगा याविषयी ▶▶ उर्वरित पान २ वर

## देवगावचे भुमिपूत्र उत्तरेश्वर मुंडे यांना सुभेदार मेजरपदी बढती मिळाल्याबद्दल नागरी सत्कार संपन्न

### उत्तरेश्वर मुंडे यांनी मिळवलेले यश हे केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण देवगावकरांसाठी प्रेरणा देणारे आहे– माजी जि.प.सदस्य विजयकांत (भैय्या) मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील देवगावचे भूमिपुत्र उत्तरेश्वर महिपती मुंडे (अण्णा) यांची भारतीय लष्करात 'सुभेदार मेजर' या अत्यंत मानाच्या पदावर पदोन्नती झाल्याबद्दल देवगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.एका ग्रामीण भागातील युवकाने आपल्या कष्टाने आणि जिद्दीने लष्करातील उच्च पदापर्यंत मजल मारल्याबद्दल संपूर्ण गावात अभिमानाचे वातावरण आहे. या सत्कार समारंभाचे अध्यक्षस्थान सामाजिक कार्यकर्ते प्रा. हनुमंत भोसले सर यांनी



भूषवले. याप्रसंगी परिसरातील अनेक राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती, ज्यामध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य, विजयकांत (भैय्या) मुंडे, रमाकांत (बापू) मुंडे ज्येष्ठ नेते, ॲड. नवनाथ मुंडे, देवगाव चे सरपंच अतुल (दादा) मुंडे, पी. एस. नागरगोजे उपस्थित ▶▶ उर्वरित पान २ वर

## रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करा ,डी वाय एफ आय युवक संघटनेचे सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयावर निदर्शने

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई, मोहा – सिरसाळा हा राज्य रस्ता व परळी – नागापूर – बोधेगाव – मोहा हा जिल्हा रस्ता गेल्या अनेक दिवसापासून रहदारीसाठी नादुरुस्त झाला असून,त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, युवक जनसामान्यांच्या अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. तीन वर्षापासून रस्ता मंजूर असूनही प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे अजूनही रस्ता दुरुस्त केला नाही.त्याचबरोबर मुकुंदराज काढील रस्ता सुद्धा खूप खराब झाला आहे.त्यामुळे अनेक अपघात झाले असून जीव गमवावा लागला आहे.त्यामुळ सदरील रस्ते तात्काळ दुरुस्त करावे या साठी भारताचा लोकशाहीवादी युवा



महासंघ (डीवायएफआय) युवक संघटनेने या रस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर आणून सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला. प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे आज सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयावर निदर्शने करण्यात आली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी दोन्ही रस्त्यांचे प्रश्न १० फेब्रुवारी पर्यंत मार्गी लावू असे लेखी आश्वासन दिले. त्यामुळे निदर्शने तात्पुरती स्थगित करण्यात आली. जर दिलेल्या वेळेत काम सुरू झाले नाही तर कार्यालयाचा ताबा घेऊन बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला.

यावेळी या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. अजय बुरांडे, जिल्हा सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे, ▶▶ उर्वरित पान २ वर

## आजच्या आधुनिक युगात स्त्री ही अधिक सक्षम होणे काळाची गरज : डॉ. अनिता शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

आजच्या आधुनिक युगामध्ये स्त्रीही विविध भुमिकेमध्ये समाजात काम करत असून सामाजिक आर्थिक राजकीय भुमिका ती पुर्ण करत आहे. आजच्या युगाची नवनविण आव्हाणे स्त्री समोर निर्माण होत आहेत. त्यामुळे स्त्रीयांनी अधिक सक्षम होणे काळाची गरज आहे. आपल्या देशाला सक्षम स्त्रीयांची परंपरा आहे. ज्यामध्ये राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, फातेमा शेख अशा अनेक कनखर स्त्रीयांचा वारसा आहे. म्हणून भारतीय स्त्री ही लढवय्यी आहे. आजचे



प्रश्न वेगवेगळे जरी असले तरी भारतीय स्त्रीला ती पेलवायलाच हवी. स्वतःचा संसार संभाळून सामाजिक, राजकीय क्षेत्रामध्ये स्त्रीया चोखपणे बजावत आहेत. प्रश्न कितीही जटील असले तरी त्याची सोडवणूक करायलाच पाहीजे. शिक्षण नोकरी संशोधन अशा क्षेत्रामध्ये स्त्रीयांनी उंच भरारी घेयला हवी. ▶ उर्वरित पान २ वर

## माऊली बालसदन मांगवडगाव जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवात नेत्रदीपक कामगिरी



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग, अंतर्गत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बीड याच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी बालगृहातील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा तसेच त्यांच्यात सांघिक भावना व निर्माण होऊन एकमेकांविषयी बंधुभाव, सहकार्य या भावना निर्माण होण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन केले जात असते. याच उद्देशाने जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव पांडुरंग बालक आश्रम बीड रोड केज येथे दिनांक १६ जानेवारी ते १८ जानेवारी २०२६ ▶▶ उर्वरित पान २ वर

